भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०५/२०१७

१) महिलेचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १३/०५/२०१७ ते ११.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही स्वयंपाक रुम मध्ये गॅस शेगळी साफ करीत असतांना यातील आरोपी हा फिर्यादी जवळ जावुन तिचे अंगाला बिलगुन तिचे सोबत अश्लिल कृत्य करुन तिचा विनयभंग केला व तु जर कोणाला सांगितली तर तुला जिवाने मारल्या शिवाय ठेवनार नाही अशी धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. पालांदुर येथे कलम ३५३(अ)(२),५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो. स्टे पालांदुर हे करीत आहेत.

२) मोटार सायकलची चोरी . :—

दिनांक १२/०५/२०१७ ते १९.०० ते २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी कमलेश भजनदास मेश्राम वय ३२ वर्ष, रा. बंगाली कॉलोनी आंबेडकर वार्ड भंडारा याने भंडारा येथुन आपले होंडा स्पलेंन्डर प्लस कंपनीची मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ पी ०७७२ किंमती २०,०००/—रु. ची वर ईलेक्ट्रानिक सामान विकण्यास पहेला बाजारात आणुन दुकाण लावुन मोटार सायकल समोरील करंजीच्या झाडाखाली ठेवुन बाजारात सामान विकत असतांनी कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. अडयाळ येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पो. स्टे अडयाळ हे करीत आहेत.

३) मोटार सायकलची चोरी . :—

दिनांक ०७/०५/२०१७ ते १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी संदीप पुरुषोत्तम बांगळकर वय २७ वर्ष, रा. सुभाष वार्ड वरठी याची हिरो सुपर स्पलेंन्डर मोटार सायकल क्रमांक एमएच ३६/डब्लु ३३९१ किंमती ३०,०००/—रु. ची ही नागमंदीराजवळ बाजार चौक वरठी येथे ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुभंलवार पो. स्टे वरठी हे करीत आहेत.

४) शेतातील धानाचा पुंजना जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १२/०५/२०१६ चे १३/०५/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे शेतातील एक हजार जातीचे धानाचा पुंजना जाळुन ३०,०००/—रु. ची नुकसान केल्याने फिर्यादी अशोक महादेव कापगते वय ५० वर्ष, रा. मानेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. दिघोरी येथे कलम ४३५ भांदवि. गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**५) जादुटोना केल्याच्या कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व दोन्ही हात पकडुन रोडावर आपटुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०५/२०१७ चे ११.१५ वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस त्याचे नाव घेवुन साल्या 'तु माझ्या मावशिला जादुटोना करुन भुत लावलास' तुझा नाव घेत आहे असे बोलुन सार्वजनीक रोडवर अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन त्याचे दोन्ही हात पकडुन रोडावर आपटुन जखमी केल्याने फिर्यादी सखाराम पैकुजी वाट वय ६६ वर्ष, रा. मोगरा(शिवनी) यांचे लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम २९४,३२३ भांदवि. सहकलम ३(१)(ख),७ महा.जादु.प्रतिअधि. २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक १३/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. तुमसर, गोबरवाही व साकोली येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारु किंमती १,८००/रु. व १ लिटर ४४० मिली लिटर देशी दारु किंमती ४००/—रु. असा एकुण किंमती २,२००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहेत.

14-5

(के.एम.हत्तीमारे)

सपोनी. जिवीशा भंडारा

दुरध्वनी.क्र८६६८६९५६३५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.